Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary International E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (I)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai, Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

Scanned by CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN-2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) – 0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवी हक्क : बालहक्क दृष्टिक्षेप

प्रा. आर.बी.काळे
समाजशास्त्र विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

---

**प्रस्तावना :**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाचा घटक या नात्याने आपले जीवन समाजात जगत असतो. मानवी जीवनाच्या अनेक गरजा असतात व व्यक्तीला समाजात राहूनच या गरजा पूर्ण कराव्या लागतात. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण होत असते. अर्थात मानवाच्या वर्तनावर काही निर्बंध घातले जातात, पण असे निर्बंध असले तरी व्यक्तीची प्रगती व्हावी म्हणून हक्काची गरज निर्माण होते. म्हणून हक्क म्हणजे व्यक्तींना तिच्या सर्वांगीण विकासासाठी समाज व राज्य यांनी प्राप्त करून दिलेली संधी होय.

कोणत्याही देशाचा भविष्याचा आधारस्तंभ हा बालक असतो. बालकावर कशा प्रकारे सामाजिकरण केले जाते त्यावरून तो घडत जातो व जडणघडणीमध्ये कुटुंबाबरोबर शासनाचा सुध्दा मोठ्या प्रमाणात वाटा असतो. प्रत्येक बालकाला संधीचा समान स्वरुपात फायदा मिळावा यासाठी बालकांनासुध्दा हक्क प्रदान करण्यात आले आहे. या हक्कांकडे समाजाचे दुर्लक्ष होवु नये,कारण मानवी हक्क आणि बालहक्क हे परस्परसंबंधीत आहेत बालहक्काचे उल्लंघन म्हणजे बालहक्काचे उल्लंघन होय. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 1989 साली झाली ठरावाव्दारे बालहक्कासाठी सनद तयार केलेली आहे. त्यानुसार बालकांना सर्व प्रकारचे नागरी, राजकीय, आर्थीक, सामाजिक, सांस्कृतिक हक्क दिले गेले आहेत. हे सर्व हक्क बहाल करणे आंतरराष्ट्रीय कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे कोणत्याही बालकाला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करून घेणे शक्य होवून देशाच्या विकासाला मदत होत असते.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**उद्देश :-**

1. मानवी हक्काची संकल्पना समजावून घेणे.
2. बालक हक्क व वास्तविकतेचा अभ्यास करणे.

**मानवी हक्काची संकल्पना :-**

सर्व व्यक्तींना नैसर्गीक हक्क असतात. त्यांचे हक्क स्वतःकडून, संबधीत राष्ट्राकडून संरक्षित केले गेले पाहिजे. मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे सर्व व्यक्तींना असतात आणि जे त्यांच्यापासून वेगळे करता येत नाही. संयुक्त राष्ट्रसंघाने 1948 साली मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रस्तुत केला आणि मानवतेच्या विविध प्रश्नावर करारनामे केले. या करारनाम्यांना सभासद राष्ट्रांनी मंजुरी देवून या करारनाम्यांशी प्रतिबध्द व्हावे यासाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील आहे.राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर मानवी हक्कांना औपचारीक व वैश्विक स्वरुप प्राप्त झाले. मानवी हक्कांचा उल्लेख काही वेळेला पायाभूत हक्क, मूलभूत हक्क, नैसर्गिक हक्क आणि स्वाभाविक हक्क या संज्ञानी देखील केला जातो.

**रँडमहाऊस विश्वकोष :-**

मानव हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहे.

**1993 सालच्या मानवी हक्क कायद्यानुसार :-**

' मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधीत आहे.

भारतीय राज्यघटनेत मानवी हक्काची संकल्पना स्पष्टपणे नमूद करण्यात आली असून ती खालील चार मुलभूत तत्वांवर आधारलेली आहे.

1) न्याय 2) स्वातंत्र्य 3) समानता 4) बंधुभाव

थोडक्यात मानवी हक्क जन्मतः मिळालेले असे हक्क आहेत जे व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी, मानवी मुल्यांच्या जपणुकीकरता, संवर्धनासाठी, बौध्दिक, वैचारीक व सदसद् विवेक बुध्दीच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहेत. तसेच ते मानवाच्या इतर गरजा भागविण्याकरता आवश्यक असतात.

**बालहक्क व वास्तविकता :-**

बालकांचे समाजातील स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे भारत हा तरुणांचा देश समजला जातो. बालकांची काळजी घेणे हे ज्या त्या देशाचे प्रमुख कार्य आहे. बालकांचा कल्याणासाठी अनेक स्तरावर प्रयत्न केले आहे. बालकल्याण अंतर्गत अनेक धोरणे राबविण्यात आली आहेत. जेणेकरुन बालकांचा संपूर्ण पर्यायाने देशाचा सर्वांगीण विकास होय.

**युनो व बालकल्याण :-**

युनायटेड नेशन्स नी 1989 साली बालकांचे हक्क मान्य केले आहेत. त्यांचे अधिकार आंतरराष्ट्रीय कायद्याचा एक भाग मानले आहेत. सर्व सामान्य व्यक्तीप्रमाणे सर्वच हक्क बालकांनाही देण्यात आलेले आहेत.

1) मुलांचे सर्वोत्तम कल्याण व विकास साध्य करणे.
2) सर्व क्षमतांचा विकास हा सर्व बालकांचा हक्क आहे.
3) प्रत्येक बालकास सर्वोत्तम आरोग्य, सेवा व काळजीचा हक्क आहे.
4) आपले विचार व्यक्त करणे व माहिती मिळविण्याचा अधिकार आहे.
5) जन्मानंतर लवकरात नाव नोंद, राष्ट्रीयत्व हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे.
6) खेळण्याचा व वाढण्याचा हक्क मान्य केला आहे.
7) कोणत्याही प्रकारच्या लैंगिक शोषणापासून संरक्षण होणे हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे.



Scanned by CamScanner

व अन्न, आरोग्य, शिक्षण घेणे, मनोरंजन, खेळ खेळणी हे सर्व अधिकार व हक्क सर्व जगाने मान्य केले आहेत. भारतानेही आपले बालकल्याण धोरण ठरविताना वरील सर्व हक्कांचा त्यात समावेश केलेला आहे.

**बालक व मानवी हक्क**

1) सर्व मुलांना सामाजिक संरक्षण मिळविण्याचा आहे.

2) प्राथमिक व मूलभूत शिक्षण मोफत व सक्तीचे मिळणे हा मानवी हक्क आहे. ते राज्याचे उत्तरदायित्व असते.

3) संघटीत व असंघटीत क्षेत्रात 14 वर्षाखालील काम करणाऱ्या मुलांना कामगार असे समजले जाते.

देशाच्या उभारणीचे बीजे ही बालकांचा चांगला विकास करण्यात आहे. शारीरिक, नैतिक, मानसिक विकास हा त्यांचा हक्क आहे हा विकास करताना कोणत्याही धर्माची, जातीची, वंशाची, भाषेची, प्रांताची, लिंगाची आहेत असा भेदभाव न करता ती बालके राष्ट्राची संपत्ती आहे असा विचार प्रत्येकामध्ये असणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव बालके शारीरिक, बौध्दिक मानसिक व नैतिक विकासापासून दूर राहता कामा नये याची काळजी घेणे हा त्या बालकांचा हक्क आहे. परंतु समाजात बालकांची त्यांच्या कुटुंबाकडून तसेच व्यवस्थेकडून त्यांच्या हक्कांचे हनन होताना दिसत आहे. बालकांना लहानपणापासून बौध्दीक, शारीरिक, मानसिकतेचा विचार न करता त्यांच्यावर अनावश्यक गोष्टी लादल्या जात आहे. बालकांची आवड-निवड न विचारता त्यांना त्यांच्या मनो विरुध्द वेगवेगळ्या शाळेत टाकणे, वेगवेगळ्या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी दबाव टाकणे, वेगवेगळे ट्युशनला घालणे अशा अनेक प्रकारच्या पध्दतीतून त्यांना त्यांच्या मुक्त खेळण्या-बागडण्यावर जणू काही बंदी घातल्या जात आहे. त्यातून बालकांच्या मनावर ताण पडताना दिसून येतो. त्यामुळे त्यांची शारीरिक व बौध्दिक क्षमतेचा ऱ्हास आपण करत आहोत. एवढ्या पर्यंतच आपण थांबत नाही तर त्यांनी परिक्षेत मिळवलेल्या गुणावर त्यांची बौध्दीक क्षमता ठरवत आहे. त्यामुळे त्यांच्यावर एक प्रकारे दबाव आणून त्या बालकाला असे वाटते की आपल्याला कमी गुण मिळाले म्हणजे खुप मोठा गुन्हा केला आहे. अशी त्याची मानसिकता बनत चालली आहे. त्यातून बालकामध्ये नैराश्य येवून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. बालकांना समाज एकप्रकारे वस्तू मानत चालला आहे.

समाजात कोणताही घटक मानवी हक्काबाबत फारसा गंभीर असल्याचे दिसून येत नाही. बालकांचे शोषण केले जाणार नाही आणि त्यांना कोणत्याही धोकादायक व्यवसायात काम करावे लागणार नाही हा राज्य घटनेने दिलेला मुलभूत हक्क आहे परंतु 10 ते 12 वर्ष वयोगटातील असंख्य मुलांना कचरा कुंड्यातील कचरा वेचताना, भीक मागताना आपण बघतो परंतु कोणीही त्या मुलांची दखल घेत नाही. शहराच्या बाहेरील धाब्यांवर 14 वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले काम करताना दिसुन येतात. राज्य व्यवस्थेत काम करणारे आणि समाजव्यवस्थेत वावरणारे अनेक मान्यवर लोक या धाब्यांवर जेवण घेतात, चहा पितात या मान्यवरांना चहा व जेवण आणून देण्याचे काम हीच मुले करतात परंतु आपली मान्यवर मंडळी त्याची दखल घेत नाही.

**सारांश :-**

बाल हक्क नेमके काय आहेत, याबाबत नागरीकांना माहिती व्हावी यासाठी कार्यशाळा, वेगवेगळ्या स्पर्धा, कार्यक्रमाव्दारे प्रबोधन करणे. लहान मुलांना घरगडी ठेवणे तो गुन्हा आहे,याशिवाय दहशतवाद, जातीय हिंसाचार, नैसर्गिक आपत्ती, कुपोषण, अस्थिरता, देहविक्री या सर्व प्रकारातून बालकांवर होणारे आघात या सर्व बाबींचे प्रबोधन झाल्यास बालकांच्या हक्काचे हनन होणार नाही.

**संदर्भ सुची :-**

1. www.nshirji.ac.in.
2. http:mr.m.wikipedia.org
3. देवळणकर, शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण.
4. गुप्ता, पु.एस - मानवी अधिकार.



Scanned by CamScanner